सबसे ‘तेज’ ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २९१ | सोमवार, दि. १३ जुलै २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com



**रवि ज्वेलर्स**
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१

**सोने-चांदी**

**आजचे भाव**

| | |
|---|---|
| २४ सोने ९९.५०% | ₹ १४२७०० |
| २२ सोने ९१.६०% | ₹ १३१२०० |
| १८ सोने ७५.००% | ₹ १०८७०० |
| शुद्ध चांदी ९९९% | ₹ २२८०/- |

भाव प्रती १० ग्रॅम


# आर्थिक शिस्त राखत संघटनात्मक बळकटीतून कामकाज करणार

## अमळनेर शेतकी संघाच्या पहिल्याच सभेत नव्या संचालक मंडळाचा निर्णय; विविध समित्या स्थापन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : अमळनेर तालुका शेतकरी सहकारी संघाची पंचवार्षिक निवडणूक नुकतीच पार पडली. त्यानंतर शनिवार, दि. ११ जुलै रोजी नव्याने निवडून आलेल्या संचालक मंडळाची पहिली सभा संघाच्या मुख्य कार्यालयात अत्यंत उत्साहपूर्ण व सकारात्मक वातावरणात झाली.

नव्या अध्यक्षांच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीत संस्थेचे प्रशासन, आर्थिक शिस्त, संघटनात्मक बळकटी आणि भविष्यातील कामकाजाच्या दिशेने महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. सभेच्या प्रारंभी नवनियुक्त अध्यक्ष संभाजी लोटनराव पाटील तसेच उपाध्यक्ष गणेश धर्मराज भामरे यांचा नवनिर्वाचित संचालक मंडळाने पुष्पगुच्छ देऊन जाहीर सत्कार केला. तसेच नव्या अध्यक्षांचे अभिनंदन करत माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा भाईदास पाटील यांच्या नेतृत्वाखाली व नूतन अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्या मार्गदर्शनाखाली संस्था अधिक सक्षम, पारदर्शक आणि शेतकरीहिताच्या दिशेने कार्य करेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. यानंतर सभेचे कामकाज सुरू झाले. सभेत एकूण सहा विषयांवर सविस्तर चर्चा करून त्यावर एकमताने निर्णय घेण्यात आले.

सर्वप्रथम दि. १० जून २०२६ रोजी झालेल्या मागील सभेचे इतिवृत्त (प्रोसिडिंग) वाचून ते कायम करण्यात आले. त्यानंतर दि. १ जून २०२६ ते ३० जून २०२६ या कालावधीतील मुख्य कार्यालयाचा जमाखर्च सभेत मांडण्यात आला. तसेच संस्थेचे दैनंदिन कामकाज अधिक गतिमान, पारदर्शक, जबाबदार आणि परिणामकारक पद्धतीने चालावे, विविध विभागांतील निर्णय प्रक्रिया जलद व्हावी तसेच प्रत्येक विभागावर स्वतंत्रपणे प्रभावी देखरेख राहावी या उद्देशाने चार स्वतंत्र उपसमित्यांची स्थापना करण्यात आली.

**शासकीय धान्य खरेदी उपसमिती**

अध्यक्ष विक्रांत भास्कर पाटील, सदस्य संजय पुनाजी पाटील, सचिन बाळू पाटील, सुभाष सुकलाल पाटील, नितीन बापूराव पाटील.

**शेतकी विभाग उपसमिती**

अध्यक्षा सौ. सुषमाताई वासुदेव देसले, सदस्य- संजय पुनाजी पाटील, सौ. मालूताई बापूराव पाटील, सचिन बाळू पाटील, सुरेश पिरन पाटील. आमंत्रित सदस्य- अध्यक्ष- संभाजी लोटनराव पाटील, उपाध्यक्ष-गणेश धर्मराज भामरे.

**जिन विभाग उपसमिती**

अध्यक्ष- रणजीत भीमसिंग पाटील. सदस्य-संजय पुनाजी पाटील, विक्रांत भास्कर पाटील, जितेंद्र दिनकर पाटील, सौ. मालूताई बापूराव पाटील.

**नोकर नियंत्रण उपसमिती**

अध्यक्ष- शंकर बंडू बैसाणे. सदस्य- नितीन बापूराव पाटील, श्याम साहेबराव पवार, सचिन बाळू पाटील, प्रफुल्ल हिरालाल पवार.

या सर्व उपसमित्यांमार्फत संबंधित विभागांचे नियोजन, अंमलबजावणी, देखरेख, आर्थिक शिस्त, कार्यक्षमता आणि शेतकरीहिताचे निर्णय अधिक प्रभावीपणे राबविण्यात येणार असल्याचे बैठकीत स्पष्ट करण्यात आले. सभेच्या शेवटी प्रेसिडेंट यांच्या पूर्वपरवानगीने आयत्यावेळी उपस्थित करण्यात आलेल्या विषयांवरही सकारात्मक चर्चा झाली. आगामी काळात संघाच्या सर्व विभागांचे आधुनिकीकरण, आर्थिक शिस्त, पारदर्शक प्रशासन, सभासद-केंद्रित सेवा आणि शेतकरी कल्याणाला सर्वोच्च प्राधान्य देत संघाला प्रगतीच्या नव्या उंचीवर नेण्यासाठी सर्व संचालकांनी एकजुटीने कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला. नव्याने स्थापन झालेल्या संचालक मंडळाच्या पहिल्याच बैठकीत घेतलेल्या या महत्त्वपूर्ण निर्णयांमुळे अमळनेर तालुका शेतकरी सहकारी संघाच्या प्रशासनाला अधिक बळ मिळणार असून, संघाच्या सर्वांगीण विकासाबरोबरच सभासद शेतकऱ्यांना अधिक सक्षम, गतिमान आणि पारदर्शक सेवा उपलब्ध होतील, असा विश्वास उपस्थित संचालकांनी व्यक्त केला.

यावेळी शेतकरी संघाचे व्यवस्थापक संजय पाटील यांनी संस्थेचा आर्थिक व प्रशासकीय लेखाजोखा, विविध विभागांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा तसेच चालू व प्रस्तावित उपक्रमांची माहिती संचालक मंडळाला दिली.


आजचे
अभीष्टचिंतन





श्री. सुबोध पाटील
ग्रीनरी कन्सल्टंट, मंगळग्रह सेवा संस्था


# माजी आमदार शिरीष चौधरींसह चौघांविरुद्ध नऊ कोटी निधी गैरव्यवहारप्रकरणी गुन्हा दाखल

## माजी मंत्री डॉ. गावितांच्या नावाचा गैरवापर; शासकीय निधी वळविल्याचा आरोप

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : नंदुरबार शहरातील विविध समाजांच्या सभागृहांसाठी आणि मंदिरांसाठी मंजूर करण्यात आलेल्या सुमारे नऊ कोटी रुपयांच्या शासकीय विकास निधीच्या कथित गैरव्यवहारप्रकरणी माजी आमदार शिरीषदादा चौधरी यांच्यासह गौरव प्रकाश चौधरी, नयन दिलीप चौधरी, अकाउंटंट किशोर तुळशीराम पाटील (रा. रनाळे) तसेच इतरांविरुद्ध नंदुरबार शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

या प्रकरणामुळे नंदुरबार जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली आहे. नंदुरबार शहर भाजप कार्यालयप्रमुख अशोक बेहेरे यांनी यासंदर्भात तक्रार दिल्यानंतर पोलिसांनी चौकशी करून हा गुन्हा नोंदविला आहे.

तक्रारीत म्हटले आहे, की तत्कालीन आदिवासी विकासमंत्री डॉ. विजयकुमार गावित यांच्या कार्यकाळात २०२२ ते २०२४ दरम्यान विविध विकासकामांसाठी शासनाने मोठा निधी मंजूर केला होता. मात्र, डॉ. गावित आजारी असताना त्यांच्या नावाचे कथित बनावट लेटरहेड व बनावट स्वाक्षऱ्या तयार करून मंत्रालयात शुद्धीपत्रके सादर केली. त्याद्वारे मूळ शासन निर्णयात बदल करून सुमारे नऊ कोटी रुपयांचा निधी इतर कामांकडे वळविला आहे. या प्रकरणातील प्राथमिक चौकशीत वळविलेल्या निधीपैकी सुमारे दोन कोटी रुपयांची कामे स्व. हिरालाल मगनलाल चौधरी यांच्या नावाने स्मृती उद्यान व सभागृहासाठी मंजूर करण्यात आल्याचे समोर आल्याचा उल्लेख पोलिसांच्या प्रेसनोटमध्ये केलेला आहे.

### शिरीषदादांसह आरोपींचा पोलिसांकडून शोध सुरू

प्रेसनोटमध्ये माजी आमदार शिरीषदादा चौधरी यांच्याविरुद्ध यापूर्वीही खुनाचा प्रयत्न, विनयभंग, दंगा, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान आदी स्वरूपाचे एकूण १६ गुन्हे दाखल असल्याचे नमूद केले आहे. तसेच त्यांच्या काही साथीदारांविरुद्धही विविध गुन्हे दाखल असल्याचे म्हटले आहे. या प्रकरणाचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांकडून सुरू आहे.

# खरोखर आपण दूध पित आहोत का?



## दुधात भेसळसाठी वापरली जाणारी ‘व्हे पर्मिएट पावडर’ जप्त; मराठवाड्यात कारवाई

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दुधात पाणी मिसळल्याच्या तक्रारी आपण अनेकदा ऐकल्या, वाचल्या आहेत. पण आता थेट दुधात भेसळ करण्यासाठी वापरली जाणारी ‘व्हे पर्मिएट पावडर’च ‘एफडीए’च्या हाती लागली आहे. राज्यभर सुरू असलेल्या ‘सेफ फूड, सेफ महाराष्ट्र’ मोहिमेत लातूर, छत्रपती संभाजीनगर आणि नांदेडमध्ये धडक कारवाया करण्यात आल्या आहेत. फुलंब्रीतील दोन दूध डेअरी सील करण्यात आल्या असून, भेसळयुक्त दूध आणि दूध पावडर नष्ट करण्यात आली आहे. या कारवाईतून नेमके काय समोर आले. दुसरीकडे शिर्डीजवळील एका गावात ‘एफडीए’ने कारवाई करीत दूध संकलन केंद्राचा परवाना निलंबित केला आहे. त्यामुळे राज्यभर तुकाराम मुंढे इम्पॅक्ट पाहायला मिळत आहे.

अन्न सुरक्षा आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या ‘सेफ फूड, सेफ महाराष्ट्र’ मोहिमंतर्गत अन्न व औषध प्रशासनाने राज्यभर भेसळयुक्त अन्नपदार्थांविरोधात मोठी मोहीम सुरू केली आहे. लातूर जिल्ह्यातील

पान २ वर

### शिर्डीजवळील गावात ‘एफडीए’चा छापा; परवाना निलंबित

शिर्डीजवळील सावळीविहीर गावात ‘एफडीए’ने कारवाई करत दूध संकलन केंद्राचा परवाना निलंबित केला आहे. येथील साई जतिन दूध संकलन केंद्रावर अन्न व औषध प्रशासनाने छापेमारी केली. येथील दूध संकलन केंद्राच्या तपासणीत गंभीर अनियमितता आढळल्याने त्याचा परवाना निलंबित करण्यात आला आहे. दूध टँकर नोंदी आणि गुणवत्ता नियंत्रण प्रक्रियेत त्रुटी असल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. दूध संकलन, डिस्पॅच, लॅब आणि टँकर रिजेक्शनच्या नोंदी अपूर्ण असल्याचे ‘एफडीए’ पथकाच्या तपासणीत समोर आल. गेल्या सहा महिन्यात दूध संकलन केंद्राचे २२ टँकर रिजेक्ट झाले. मात्र, दूध संकलन केंद्राकडे कुठलीही नोंद नसल्याची गंभीर बाब समोर आली असून ‘एफडीए’ने दुधाचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविले आहेत.


**गर्व से कहो स्वदेशी है हम...!**
**स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!

जय भारत...!
जय स्वदेशी...!!


# अवैधपणे मुरुम वाहून नेणारे डंपर पोलिसांनी पकडले

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : तालुक्यातील रंजाणे शिवारात अवैधपणे मुरुम वाहून नेणारे डंपर मारवड पोलिसांनी जप्त केले. शनिवार, दि. ११ जुलै रोजी रात्री नऊच्या सुमारास सहाय्यक पोलीस निरीक्षक साजीद मन्सुरी, फिरोज बागवान, हवालदार संजय सूर्यवंशी, संजय पाटील, पोलीस शिपाई प्रवीण पाटील हे पेट्रोलिंग करताना रंजाणे शिवारातील ग्रीन पार्क हॉटेलजवळ अशोक लेलँड कंपनीचे पिवळ्या रंगाचे डंपर (एमएच ३९- एडी २३४८) मुरुम वाहताना दिसून आले. डंपरचालक अंकुश अशोक सोनवणे व त्याच्यासोबत असलेल्या नामदेव प्रल्हाद सोनवणे यांना परवान्याबाबत विचारणा केली असता कोणताही परवाना त्यांच्याकडे आढळून आला नाही. डंपरमालकाचे नाव शरद पुरुषोत्तम पाटील (रा. तासखेडा) असे असल्याचे चालकाने सांगितले. त्यानंतर पोलिसांनी डंपर जप्त करून चालक, त्याचा सहकारी व मालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील पाटील तपास करीत आहेत.

# ‘एआय चष्मा’ बनवणार ‘वॉकिंग कॅमेरा’

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मोबाईल तंत्रज्ञानाचे पुढील युग सामान्य नागरिकांना ‘वॉकिंग कॅमेरा’ (चालता-बोलता कॅमेरा) बनवेल. कारण, कृत्रिम बुद्धिमत्तेवर (एआय) चालणारे ‘स्मार्ट चष्मे’ (स्मार्ट ग्लासेस) युजर्स जे काही पाहतील आणि ऐकतील त्यावर रिअल-टाईममध्ये लक्ष ठेवतील, असे भाकीत क्वालकॉमचे सीईओ ख्रिस्तियानो अमोन यांनी केले आहे. ‘मॉर्निंग्स विथ मारिया’ या कार्यक्रमात बोलताना अमोन यांनी स्पष्ट केले की, भविष्यातील अति-वेगवान ६जी नेटवर्कमुळे हे स्मार्ट चष्मे त्यांनी गोळा केलेली माहिती थेट एआय मॉडेल्सना पाठवू शकतील, त्यामुळे तंत्रज्ञान क्षेत्र आणि मानवी जीवन पूर्णपणे बदलून जाईल.

**मानवी शरीराचा वापर आणि एआय**

सीईओ अमोन यांच्या मते आपण संगणकाशी अगदी माणसांसारखाच संवाद साधू

पान २ वर






**श्री. सुबोध पाटील**
ग्रीनरी कन्सल्टंट :
मंगळ ग्रह सेवा संस्था, अमळनेर

आपणास वाढदिवसाच्या अनेकोत्तम
‘मंगलमय’ शुभेच्छा...!

* शुभेच्छुक *
सर्व मित्र परिवार, आप्तेष्ट,
मंगळ ग्रह सेवा संस्था,
रोटरी क्लब अमळनेर.


# ऐतिहासिक साने गुरुजी ग्रंथालयाचा कारभार असनदशीर?

## सहा वर्षांपासून निवडणूकच नाही; माजी अध्यक्ष आत्माराम चौधरींचा आरोप

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील तब्बल १५४ वर्षांची वैभवशाली परंपरा लाभलेल्या येथील पूज्य साने गुरुजी ग्रंथालय व मोफत वाचनालयातील कारभाराबाबत गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. कार्यकारी मंडळाची मुदत दि. २२ जुलै २०२० रोजी संपुष्टात येऊनही तब्बल सहा वर्षे निवडणूक न घेता संस्थेचा कारभार सुरू ठेवण्यात आल्याचा आरोप सभासदांनी केला आहे. या कालावधीत शासनाकडून दरवर्षी मिळणाऱ्या सुमारे साडेसहा लाख रुपयांच्या अनुदानावर आर्थिक व धोरणात्मक निर्णय घेण्यात आले. मात्र, सभासदांसाठी व्याख्यानमाला, साहित्यिक उपक्रम व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले नसल्याचाही आरोप करण्यात आला आहे.



यात भर म्हणजे रविवार, दि. १२ जुलै रोजी सन २०२२, २०२३, २०२४ व २०२५ या वर्षांच्या वार्षिक सर्वसाधारण सभा एकाच दिवशी घेण्याचे नियोजन केले. या सभेसाठी अनेक सभासदांना नियमानुसार घरपोच अजेंडा देण्यात आला नसल्याचा आरोप आहे. विशेष म्हणजे सभेपुढील विषयपत्रिकेतील विषय क्रमांक ९ ‘कार्यकारी मंडळाची निवड करणे (नियम ३०) (सन २०२६-२७)’ हा सर्वाधिक वादग्रस्त ठरला आहे.

ग्रंथालयाचे माजी अध्यक्ष आत्माराम चौधरी यांनी हा प्रकार बेकायदेशीर, घटनाबाह्य व सभासदांच्या मतदानाच्या हक्कावर गदा आणणारा असल्याचा आरोप केला आहे. कार्यकारी मंडळाची मुदत संपल्यानंतर स्वतंत्र निवडणूक प्रक्रिया राबविण्याऐवजी वार्षिक सर्वसाधारण सभेतच थेट कार्यकारी मंडळाची निवड करण्याचा प्रयत्न म्हणजे सभासदांच्या लोकशाही अधिकारांवर घाला असल्याचे त्यांनी म्हटले आहे. दरम्यान, निवडणुकीसंदर्भात विचारणा केल्यानंतर मतदारांची प्रारूप यादी तयार करण्याचे काम सुरू असून लवकरच निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात येईल, अशी माहिती ग्रंथालयाचे अध्यक्ष दिलीप सोनवणे यांनी दिल्याचे सभासद चंद्रशेखर भावसार यांनी सांगितले. मात्र, एकीकडे विरोधी सभासदांना निवडणूक घेण्याचे आश्वासन देत असताना दुसरीकडे आपल्या

पान २ वर

> **“वार्षिक सर्वसाधारण सभेत कार्यकारी मंडळाची निवड करणे ही घटनेत तरतूद आहे. म्हणून सभेपुढील विषय पत्रिकेत विषय क्रमांक ९ घेतलेला आहे. मात्र, वाचनालयाच्या मतदारांची प्रारूप यादी तयार झाली असून, आम्हाला लवकरच निवडणूक कार्यक्रम जाहीर करावयाचा आहे. त्यामुळे सभासदांनी गैरसमज करून घेऊ नये.**
>
> **- दिलीप सोनवणे, अध्यक्ष, पूज्य साने गुरुजी ग्रंथालय व मोफत वाचनालय, अमळनेर.**

## संपादकीय

# मुलींचा जन्मदर कमी होणे हा गंभीर इशारा

समाजाच्या प्रगतीचे मोजमाप केवळ आर्थिक विकासाने किंवा आधुनिक तंत्रज्ञानाने होत नाही, तर त्या समाजात स्त्री आणि पुरुष यांना मिळणाऱ्या सन्मान स्थानावरूनही होते. मुलींचा जन्मदर कमी होणे ही केवळ लोकसंख्येशी संबंधित संबंधित समस्या नसून सामाजिक न्याय, स्त्री-पुरुष समानता, मानवी मूल्ये आणि समाजाच्या सर्वांगीण विकासाशी निगडित अत्यंत गंभीर बाब आहे. मुलगी ही कुटुंबाचा, समाजाचा आणि राष्ट्राच्या भवितव्याचा महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. त्यामुळे मुलींच्या जन्माकडे सकारात्मक दृष्टीने पाहणे आणि त्यांचे अस्तित्व जपणे ही काळाची गरज आहे. समाजातील स्त्री-पुरुषांचे प्रमाण संतुलित असणे हे सामाजिक स्थैर्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. परंतु अनेक ठिकाणी मुलांच्या तुलनेत मुलींची संख्या सातत्याने घटत असल्याने लोकसंख्येचा समतोल बिघडत आहे. या असमतोलाचे परिणाम आज विविध स्वरूपात समाजासमोर येत आहेत. विवाहासाठी योग्य वधू मिळणे कठीण होत असून, अनेक युवकांचे विवाह उशिरा होत आहेत किंवा काहींना आयुष्यभर अविवाहित राहण्याची वेळ येत आहे. काही भागांत इतर राज्यांतून किंवा समाजांतून वधू आणण्याची प्रथा वाढत असून त्यामुळे सांस्कृतिक, भाषिक आणि सामाजिक जुळवून घेण्याच्या अनेक समस्या निर्माण होत आहेत. याशिवाय महिलांविरुद्धचे गुन्हे, मानवी तस्करी, जबरदस्तीचे विवाह आणि सामाजिक असुरक्षितता यांसारख्या समस्यांनाही खतपाणी मिळण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

आजही समाजातील काही भागांत मुलगा हा वंशाचा दिवा आणि मुलगी ही आर्थिक भार असल्याची चुकीची मानसिकता कायम आहे. हुंडा प्रथा, मुलींच्या शिक्षणाकडे होणारे दुर्लक्ष, गर्भलिंग निदान चाचण्यांचा गैरवापर आणि स्त्रीभ्रूणहत्या या प्रवृत्तीमुळे मुलींच्या जन्माचे प्रमाण घटले आहे. कायद्याने गर्भलिंग तपासणी आणि स्त्रीभ्रूणहत्या या प्रवृत्तींमुळे मुलींच्या जन्माचे प्रमाण घटले आहे. कायद्याने गर्भलिंग तपासणी आणि स्त्रीभ्रूणहत्या प्रतिबंधित असली, तरी काही ठिकाणी या कायद्याचे उल्लंघन होत असल्याचे वास्तव नाकारता येत नाही. त्यामुळे केवळ कायदे करून ही समस्या सुटणार नाही, तर समाजाची मानसिकता बदलणेही तितकेच आवश्यक आहे. मुलगी म्हणजे दोन कुटुंबांना जोडणारा प्रेमाचा दुवा आहे. ती आई, बहीण, पत्नी, मुलगी, शिक्षिका, वैज्ञानिक, डॉक्टर, सैनिक, प्रशासकीय अधिकारी, उद्योजिका अशा अनेक भूमिका समर्थपणे पार पाडत समाजाच्या प्रगतीत मोठे योगदान देत आहे. आज प्रत्येक क्षेत्रात महिलांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे. त्यामुळे मुलगी ही कोणत्याही अर्थाने मुलापेक्षा कमी नाही, हे समाजाने मनापासून स्वीकारण्याची वेळ आली आहे. याच सामाजिक जाणीवेतून विविध संस्थांतर्फे आयोजित सामुदायिक विवाह सोहळ्यांत विवाहेच्छुक युवक-युवती, नवदाम्पत्य आणि उपस्थित नातेवाईकांना स्त्रीभ्रूणहत्या रोखण्याचा प्रभावी संदेश देण्यात येत आहे. 'स्त्री जन्माचे स्वागत करा' हा संदेश देत उपस्थितांना 'स्वीभ्रूणहत्या करणार नाही, लिंगभेद करणार नाही,' अशी शपथही देण्यात येत आहे.

सामाजिक परिवर्तनासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अत्यंत मोठे आहे. समाजात बदल घडविण्यासाठी केवळ शासनाच्या योजनांवर अवलंबून न राहता सामाजिक संस्था, स्वयंसेवी संघटना आणि नागरिकांनीही पुढाकार घेणे आवश्यक आहे. ही समस्या दूर करण्यासाठी मुलींना समान शिक्षण, आरोग्य सुविधा, सुरक्षित वातावरण आणि प्रगतीच्या समान संधी उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. पालकांनी मुलगा-मुलगी असा भेद न करता दोघांनाही समान संस्कार आणि शिक्षण द्यावे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये भावना रुजवावी. लिंगसमानतेची समाजसुधारक, धार्मिक नेते, सामाजिक संस्था आणि प्रसारमाध्यमांनीही जनजागृतीसाठी सातत्याने प्रयत्न करणे आवश्यक आहे. शासनाने राबविलेल्या 'बेटी बचाओ, बेटी पढाओ 'सारख्या योजनांचा अधिक प्रभावी प्रचार आणि अंमलबजावणी होणेही तितकेच गरजेचे आहे. मुलगी वाचली तरच कुटुंब वाचेल, समाज वाचेल आणि देशाचा विकास अधिक सक्षम होईल. प्रत्येक मुलीच्या जन्माचे आनंदाने स्वागत झाले पाहिजे. तिच्या शिक्षणासाठी, आरोग्यासाठी आणि सुरक्षित भविष्यासाठी प्रत्येकाने योगदान दिले पाहिजे. स्त्रीभ्रूणहत्या आणि लिंगभेद यांसारख्या अमानवी प्रवृत्तींना समाजातून कायमचे हद्दपार करण्याची जबाबदारी आपणा सर्वांची आहे. मुलींचा जन्मदर कमी होणे ही केवळ आकडेवारीची समस्या नाही; ती आपल्या सामाजिक संवेदनशीलतेची आणि मूल्यव्यवस्थेची कसोटी आहे. मुलींचे अस्तित्व, सन्मान आणि समान हक्क जपणे ही प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. कारण ज्या समाजात मुली सुरक्षित, सन्मानित आणि सक्षम असतात तोच समाज खऱ्या अर्थाने प्रगत, सुसंस्कृत आणि समृद्ध बनतो.

# 'लग जा गले' : एक अमर सुरावट आणि तिची गूढ जन्मकथा

भारतीय चित्रपटसृष्टीच्या सुवर्णकाळातील १९६४ हे वर्ष. याच वर्षात प्रसिद्ध दिग्दर्शक राज खोसला यांच्या 'वो कौन थी?' या रहस्यमय चित्रपटातून एका अशा गाण्याचा जन्म झाला, की ज्याने काळाच्या सीमा ओलांडून आजतागायत रसिकांच्या हृदयावर अधिराज्य गाजवले आहे. ते गाणे म्हणजे 'लग जा गले के फिर ये हसीं रात हो ना हो...'। मुख्य भूमिकेत असलेल्या साधना आणि मनोज कुमार यांच्यावर चित्रित झालेल्या या एकाच गाण्याने रहस्य, शृंगार आणि विरह या तिन्ही भावनांचा असा काही सुरेख गोफ विणला आहे, की आजही ते ऐकताना काळजाचा ठोका चुकतो.

या सुवर्णक्षणाचा जन्म आणि मनोज कुमारचे उपकाराची कहाणीच अशी भावस्पर्शी आहे. कोणत्याही अजरामर कलाकृतीचा जन्म सहजासहजी होत नाही; तिला अनेकदा नकाराच्या आणि संघर्षाच्या प्रक्रियेतून जावे लागते. संगीत दिग्दर्शक मदन मोहन या गझलच्या बादशहाने जेव्हा या गीताची चाल बांधली, तेव्हा त्यांच्या मनात एक अथांग भावना होती. मात्र, जेव्हा त्यांनी ही चाल दिग्दर्शक राज खोसला यांना ऐकवली, तेव्हा खोसला यांना ती फारशी भावली नाही आणि त्यांनी ती चक्क नाकारली. आपल्याच आत्म्याचा तुकडा असलेल्या या धूनला मिळालेला नकार मदन मोहन यांच्या जिव्हारी लागला. निराश आणि व्यथित मनाने त्यांनी ती चाल चित्रपटाचा नायक मनोज कुमार यांना ऐकवली आणि उद्विग्न होऊन विचारले, "या चालीत नेमकी काय कमी आहे?"

मनोज कुमार हे केवळ उत्तम अभिनेतेच नव्हते, तर संगीताची अचूक जाण असलेले कलासक्त व्यक्तिमत्त्व होते. ती चाल ऐकताच ते मंत्रमुग्ध झाले. त्या सुरावटीत दडलेली वेदना आणि मिलनातही असलेली विरहाची भीती त्यांनी अचूक हेरली. त्यांनी तातडीने राज खोसला यांना ती धून पुन्हा ऐकायला लावली आणि अत्यंत आग्रहाने हे गाणे चित्रपटात समाविष्ट करण्याची गळ घातली. सुदैवाने खोसला यांनी मनोज कुमार यांच्या शब्दाचा मान राखला आणि



होकार दिला. मनोज कुमार यांच्या त्या एका आग्रहाने खऱ्या अर्थाने भारतीय संगीत प्रेमींवर अनंत उपकार केले. खरेतर त्या काळी नायकाचे ऐकणारे निर्माते दिग्दर्शक देखील होते हे लक्षात यावे.

या गीताला थोर गीतकार राजा मेहदी अली खान यांच्या शब्दांचे विलक्षण कोंदण लाभले होते. "शायद फिर इस जनम में मुलाकात हो ना हो..." या ओळींमधून जीवनाची क्षणभंगुरता आणि प्रेमाची अथांगता त्यांनी कागदावर उतरवली. या शब्दांना न्याय देण्यासाठी मदन मोहन यांनी अत्यंत कल्पक वाद्यसज्जा वापरली. या गाण्यात सतार आणि व्हायोलिनचा अतिशय तरल आणि हृदयस्पर्शी वापर करण्यात आला आहे. वाद्यांचा कमीत कमी पण नेमका वापर करून गाण्यात एक प्रकारची 'शांतता' निर्माण केली गेली, जी या गाण्याचं गूढ आणखी वाढवते. आणि जेव्हा या परिपूर्ण संगीताला भारतरत्न लता मंगेशकर यांच्या स्वर्गीय आवाजाचा स्पर्श झाला, तेव्हा त्या गाण्याचे अक्षरशः सोने झाले. लतादीदींनी ज्या आर्ततेने आणि ठहरावाने हे गाणे गायले आहे, ते ऐकताना आजही अंगावर शहारे येतात.

### पडद्यावरील तो अविस्मरणीय प्रसंग आणि कॅमेऱ्याची जादू

हे गाणे जितके श्रवणीय आहे, तितकेच ते दृश्यात्मक दृष्ट्याही एक मास्टरपीस आहे. चित्रपटातील हा प्रसंग अत्यंत रहस्यमयी आणि तितक्याच रोमँटिक वातावरणात दिग्दर्शित केला गेला. हे गाणे शिमला येथील गोल्फ कोर्स आणि परिसरातील धुक्यात चित्रित करण्यात आले होते, ज्यामुळे त्या गूढ वातावरणात नैसर्गिक भर पडली.

धुके दाटलेली रात्र, सभोवताली एक गूढ शांतता आणि अशा वातावरणात पांढऱ्या शुभ्र साडीत उभी असलेली, एखाद्या अप्सरेसारखी भासणारी साधना. तिच्या चेहऱ्यावर एक अनामिक हुरहुर आणि डोळ्यांत न वाचता येणारे गूढ असते. प्रसिद्ध छायाचित्रकार के. एच. कपाडिया यांच्या ब्लॅक अँड व्हाईट कॅमेऱ्याने प्रकाशाचा आणि सावल्यांचा जो खेळ पडद्यावर उभा केला, त्याने साधनाच्या चेहऱ्यावरील भाव अधिकच गडद केले. नायक मनोज कुमार तिच्या या सौंदर्याने आणि रहस्यमय अस्तित्वाने पूर्णपणे भारावलेला असतो. ती त्याच्याकडे पाहत, अत्यंत संथ आणि लयीत हे गाणे गाते. तिच्या प्रत्येक हालचालीत, प्रत्येक कटाक्षात एक चुकार हुरहुर असते; जणू काही तिला माहीत आहे की हा क्षण पुन्हा कधीच येणार नाही.

तो प्रसंग, ते धुके, साधनाचा तो क्लोजअप, मदन मोहन यांची सतार आणि पार्श्वभूमीवर घुमणारा लता दीदींचा आवाज... हे सर्व मिळून पडद्यावर जी जादू निर्माण करतात, ती शब्दांत पकडणे कठीण आहे. १९६४ मध्ये प्रदर्शित झाल्यापासून आजतागायत संगीत क्षेत्राच्या या सुवर्णकाळात निर्माण झालेले हे गाणे रात्रीच्या निरव शांततेत जेव्हा कानावर पडते तेव्हा मन आपोआप एका वेगळ्याच विश्वात हरवून जाते. हा एका अप्रतिम गीताचा अमूल्य ठेवा रसिकांना मिळाला, तो केवळ त्या दिवशी मदन मोहन यांनी दाखविलेली जिद्द आणि मनोज कुमार यांनी दिलेल्या अचूक दादामुळेच!

**– धनंजय सोनार, अमळनेर.**
मो. : ७९७२८ ८१४४०

# दररोज मूठभर भाजलेले चणे खाल्ल्याने शरीरात कोणते बदल दिसतात?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भाजलेले चणे हा स्वस्त आणि पौष्टिक स्नॅक शरीराला प्रथिने, फायबर आणि अनेक महत्त्वाची खनिजे पुरवतो. वजन कमी करण्यासाठी फायदेशीर भाजलेल्या चण्यांमध्ये प्रथिने आणि फायबर भरपूर असल्यामुळे पोट जास्त वेळ भरलेले राहते. त्यामुळे वारंवार भूक लागत नाही आणि वजन नियंत्रणात राहण्यास मदत होते.

**पचन सुधारते**

फायबरयुक्त असल्यामुळे पचनक्रिया सुधारते, बद्धकोष्ठतेचा त्रास कमी होतो आणि आतडे निरोगी राहतात.

**रक्तातील साखर**

चण्यांतील प्रथिने आणि फायबरमुळे



कार्बोहायड्रेट्सचे शोषण हळूहळू होते, त्यामुळे रक्तातील साखरेची पातळी स्थिर राहण्यास मदत मिळू शकते.

**रोगप्रतिकारक शक्ती**

भाजलेल्या चण्यांमध्ये असलेले पोषक घटक शरीराची रोगप्रतिकारक क्षमता मजबूत ठेवण्यास मदत करतात.मजबूत हाडे कॅल्शियम, मॅग्नेशियम आणि इतर खनिजांमुळे हाडे मजबूत राहण्यास मदत होते.

**ऊर्जा आणि स्नायू**

प्रथिनांचा उत्तम स्रोत असल्यामुळे स्नायूंना बळकटी मिळते आणि शरीराला दिवसभर ऊर्जा मिळण्यास मदत होते. दररोज एक मूठ भाजलेले चणे हा आरोग्यदायी स्नॅक ठरू शकतो. मात्र संतुलित आहार आणि वैयक्तिक आरोग्यस्थितीनुसार सेवन करणे अधिक योग्य आहे.

## पान १ वरून

### खरोखर आपण दूध पित आहोत का?

किल्लारीवाडी येथे दूध संकलन केंद्रावर छापा टाकून दुधात भेसळ करण्यासाठी वापरली जाणारी व्हे पर्मिएट पावडर आणि साडेसात हजार लिटर दूध जप्त करण्यात आलं. पाच लाखांहून अधिक किमतीचा हा साठा जागेवरच नष्ट करण्यात आला. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील फुलंब्री येथील सिद्धेश्वर आणि शिवकृपा दूध डेअरीवरही कारवाई करण्यात आली. संशयित दूध आणि दूध पावडर जप्त करून नष्ट करण्यात आली असून दोन्ही डेअरी सील करण्यात आल्या आहेत. संबंधितांविरोधात फुलंब्री पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फुलंब्री येथील या डेअरींमधून इतर राज्यांमध्येही दूध पुरवठा होत असल्याची बाब प्राथमिक तपासात समोर आली असून, तपासाचा विस्तार करण्यात आला आहे. दरम्यान, नांदेडमधील एका मसाला उद्योगावर कारवाई करत लेबलिंग नियमांचे उल्लंघन आणि निकृष्ट दर्जाच्या अन्नपदार्थांच्या संशयावरून एक हजार ६१ लिटर रिफाइंड सोयाबीन तेल जप्त करण्यात आलं आहे. नागरिकांच्या आरोग्याशी कोणतीही तडजोड केली जाणार नाही. भेसळ करणाऱ्यांविरोधात यापुढेही कठोर कारवाई सुरूच राहील, असा इशारा अन्न व औषध प्रशासनाचे दिला आहे. संभाजीनगरचे अन्न व औषध प्रशासन विभागाचे संयुक्त आयुक्त श्रीकांत करकले यांनी दिला आहे.

### 'एआय चष्मा' बनवणार 'वॉकिंग कॅमेरा'

शकू. यामध्ये 'चष्मा' हा अत्यंत महत्त्वाचा घटक ठरणार आहे. कारण, तो आपल्या डोळ्यांच्या, कानांच्या आणि तोंडाच्या अगदी जवळ असतो. आपण जे पाहू, ऐकू किंवा वाचू, ते सर्व एआय सहज पाहू आणि समजून घेऊ शकेल, त्यामुळे आपल्याला अत्यंत वेगाने माहिती व बुद्धिमत्ता (इंटेलिजेन्स) प्राप्त होईल. सध्या मेटा, गुगल आणि ॲपल यांसारख्या दिग्गज कंपन्या एआय-आधारित स्मार्ट चष्मे विकसित करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करत आहेत. नुकतेच मेटा कंपनीने त्यांच्या 'म्युझ स्पार्क' या एआय तंत्रज्ञानावर चालणारे स्वस्त एआय चष्मे बाजारात आणण्याची घोषणा केली आहे.

**क्वालकॉमची मेटासोबत भागीदारी :** क्वालकॉम कंपनी प्रामुख्याने स्मार्टफोनला इंटरनेटशी जोडणारे चिप्स बनवण्यासाठी ओळखली जाते. परंतु, आता या कंपनीने डेटा सेंटर्स आणि एआय सॉफ्टवेअर aक्षेत्रात स्वतःचा विस्तार केला आहे. या आठवड्यात क्वालकॉमने मेटा कंपनीच्या वाढत्या कॉम्प्युटिंग गरजा पूर्ण करण्यासाठी एका नवीन भागीदारीची घोषणा केली आहे. या भागीदारीअंतर्गत क्वालकॉमने 'ड्रॅगनफ्लाय सी १०००' नावाचे नवीन सेंट्रल प्रोसेसिंग युनिट (सीपीयू) सादर केले आहे, तर वापर मेटा करत आहे. याशिवाय, क्वालकॉम कंपनी 'मॉड्युलर' या एआय स्टार्टअपचे अधिग्रहण करण्याची देखील योजना आखत आहे. कंपनीमध्ये होत असलेल्या या क्रांतिकारी बदलांवर बोलताना अमोन म्हणाले, "हे आता तुमच्या वडिलांच्या काळातील जुने क्वालकॉम राहिलेले नाही, तर ही एका नवीन युगाची सुरूवात आहे."

### साने गुरुजी ग्रंथालयात लोकशाहीचा खून?

मर्जीतील व नातेवाईक असलेल्या मोजक्या सभासदांच्या उपस्थितीत वार्षिक सर्वसाधारण सभेतच कार्यकारी मंडळाची निवड करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप सभासदांनी केला आहे. त्यामुळे ग्रंथालयातील वातावरण चांगलेच तापले असून सभासदांमध्ये तीव्र संतापाची भावना व्यक्त होत आहे.

या पार्श्वभूमीवर दि. १२ जुलै रोजीची वार्षिक सर्वसाधारण सभा रद्दबातल ठरवावी, कार्यकारी मंडळाची नियमबाह्य निवड रोखावी, तसेच धर्मादाय आयुक्तांच्या देखरेखीखाली स्वतंत्र, निष्पक्ष व पारदर्शक निवडणूक प्रक्रिया राबविली जावी, अशी मागणी सभासदांनी धर्मादाय आयुक्त, जळगाव यांच्याकडे लेखी स्वरूपात केली आहे.

**ग्रंथालयाची वैभवशाली परंपरा**

सन १८७२ मध्ये 'व्हिक्टोरिया जुबिली लायब्ररी' या नावाने स्थापन झालेल्या या संस्थेचे १९७२ मध्ये 'पूज्य साने गुरुजी ग्रंथालय व मोफत वाचनालय' असे नामकरण करण्यात आले. तालुक्यातील हे एकमेव 'अ' वर्ग ग्रंथालय असून येथे २५० वार्षिक सभासद, ४५० आजीवन सभासद, सुमारे ४१ हजार ग्रंथ, ५० मासिके, १८ दैनिके तसेच सभासदांसाठी घरपोच मासिक सेवा उपलब्ध आहे. ज्ञान, संस्कार आणि वाचन संस्कृतीची दीर्घ परंपरा लाभलेल्या या ऐतिहासिक संस्थेत निर्माण झालेला प्रशासन व निवडणूक प्रक्रियेवरील वाद सध्या संपूर्ण तालुक्यात चर्चेचा विषय बनला आहे.

## अमळनेरमध्ये कालिदास दिनानिमित्त

# १५ जुलैला विविध कार्यक्रमांचे आयोजन

### संस्कृत भारती आणि ज्ञानराज प्रतिष्ठान यांचा संयुक्त उपक्रम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : संस्कृत साहित्यात महाकवी कालिदासांचे वाङ्मयीन योगदान गौरवास्पद आहे. त्यांच्या मेघदूत महाकाव्यातील निसर्ग सौंदर्याचे स्मरण करण्याच्या उद्देशातून कालिदास दिनाचे औचित्य साधत येथील संस्कृत भारती आणि ज्ञानराज प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने कालिदान दिनाचे औचित्य साधून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवार, दि. १५ जुलै २०२६ रोजी शहरातील जुा टाऊन हॉलमधील टिळक मंदिरात सायंकाळी ६ वाजता आयोजित या कार्यक्रमात द्रौ. रा. कन्या शाळेच्या विद्यार्थिनी कालिदास अष्टक सादर करणार आहेत. संस्कृत शिक्षिका कालिदासांच्या साहित्याचा परिचय करून देतील. संस्कृत विषयाचे विद्यार्थी पावसाळी कविता सादर करणार असून, जळगावातील संजय पिले हे आषाढस्य प्रथम दिने (मेघदूत महाकाव्य) या विषयावर व्याख्यान देणार आहेत.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी द्रौ. रा. कन्या शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. एस. एस. सूर्यवंशी राहणार असून, संस्कृत भारती परिवारातील सुधीर टाकणे, सौ. प्रज्ञाताई परेश जोशी, देवयानीताई भावसार, तर ज्ञानराज प्रतिष्ठान परिवारातर्फे अध्यक्ष प्रा. डॉ. प्रभाकर जोशी, कोषाध्यक्ष प्रा. डी. एस. लोहार यांप्रसंगी उपस्थित राहणार आहेत. या आगळ्यावेगळ्या कार्यक्रमास समस्त अमळनेकरकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# 'सलाम बॉम्बे'फेम अभिनेत्यावर आली रिक्षा चालवण्याची वेळ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या चित्रपटात झळकणे, अभिनयासाठी सर्वत्र कौतुक होणे, इतके सगळे झाल्यानंतर कोणालाही आयुष्यात यानंतर खूप यश मिळेल, अशी अपेक्षा असते. मात्र, अभिनेता शफीक सय्यदच्या बाबतीत तसे घडले नाही. मीरा नायर यांच्या 'सलाम बॉम्बे' चित्रपटात संधी मिळण्यापूर्वी तो मुंबईच्या रस्त्यांवर राहणारा एक बेघर मुलगा होता. या चित्रपटामुळे त्याला मोठी ओळख मिळाली, पण त्यानंतरही त्याला संघर्ष काही चुकला नाही.

प्रसिद्धी माध्यमातील वृत्तानुसार १९८० च्या दशकात शफीक सय्यद घरातून पळून मुंबईत आला. हिंदी चित्रपटांमध्ये दिसणारी मुंबई प्रत्यक्षात कशी आहे, हे पाहण्याची त्याची इच्छा होती. विनातिकीट मुंबईत आलेला शफीक चर्चगेट स्थानकाजवळ रस्त्यावर राहू लागला. त्याच काळात एका महिलेने त्याच्यासह काही रस्त्यावरच्या मुलांना अभिनय कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी २० रुपये देण्याची ऑफर दिली. फसवणूक असल्याच्या संशयाने इतर मुले तिथून निघून गेली, मात्र भूक लागल्यामुळे शफीकने ती ऑफर स्वीकारली. याच निर्णयाने त्याचे आयुष्य बदलले. अनेक मुलांमधून त्याची निवड मीरा नायर यांच्या 'सलाम बॉम्बे' चित्रपटातील मुख्य भूमिकेसाठी झाली. हा चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर समीक्षकांनी त्याचे भरभरून कौतुक केले. इतकेच नव्हे, तर बेस्ट फॉरेन लँग्वेज फिल्म या श्रेणीत ऑस्कर पुरस्कारासाठी नामांकन मिळविणाऱ्या मोजक्या भारतीय चित्रपटांपैकी तो एक ठरला.

**राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्यानंतरही संघर्ष कायम राहिला**

'सलाम बॉम्बे'च्या अभूतपूर्व यशानंतर शफीक सय्यदला वाटले, की आता बॉलिवूडमध्ये त्याला खूप काम मिळेल. राष्ट्रपतींच्या हस्ते त्याचा सन्मान झाला होता आणि त्याने राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारही जिंकला होता. त्यामुळे चित्रपटसृष्टीत स्वतःचे स्थान निश्चित झाल्याचा त्याला विश्वास होता. मात्र, काही काळानंतर त्याच्याकडे काम येणे बंद झाले. या परिस्थितीमुळे निराश झालेल्या शफीकने मुंबई सोडण्याचा निर्णय घेतला आणि तो आपल्या मूळ गावी बेंगळुरूला परतला.

**चित्रपटात काम न मिळाल्यानंतर चालवली रिक्षा**

बेंगळुरूला परतल्यानंतर शफीक सय्यदने अभिनयाचा विचारच



**दोनदा आत्महत्येचाही केला प्रयत्न**

सोडून दिला आणि ऑटो रिक्षाचालक म्हणून काम करू लागला. त्याच्या कुटुंबातील पाच सदस्यांची जबाबदारी त्याच्यावर होती, पण त्याची रोजची कमाई फक्त १५० रुपये होती. आर्थिक अडचणी आणि नैराश्यामुळे त्याने दोन वेळा आत्महत्येचाही प्रयत्न केला. मात्र, दोन्ही वेळा तो वाचला.

२०१० मध्ये ओपन मॅगझीनला दिलेल्या मुलाखतीत शफीक सय्यदने 'सलाम बॉम्बे'मधील आपल्या अनुभवाबद्दल सांगितले होते. तो म्हणाला, "या चित्रपटाचे चित्रीकरण करताना मला अभिनय करावा लागतो, असे कधीच वाटले नाही. कारण त्यातील भाषा, कथा आणि प्रसंग हे मी स्वतः आयुष्यात अनुभवले होते. माझ्यासाठी तो चित्रपट माझ्याच आयुष्याची गोष्ट होती. रस्त्यावरचे भारताचे वास्तव मी जगलो होतो. ते आयुष्य मृत्यूपेक्षा वेगळे नव्हते आणि मी ते स्वतः अनुभवले होते." पुढे तो म्हणाला, "रघुवीर यादव, नाना पाटेकर आणि अनीता कंवर यांसारख्या सहकलाकारांनी मला खूप मदत केली. अभिनय म्हणजे एखाद्या परिस्थितीला प्रामाणिकपणे प्रतिसाद देणे, हे त्यांच्याकडून शिकलो. समोरचा कलाकार काय करतो, त्यानुसार आपण कसे वागायचे, हे समजले."

यानंतर एका मुलाखतीत शफीक सय्यदने सांगितले, "आमचे चित्रीकरण ५२ दिवस चालले आणि त्यासाठी मला १५ हजार रुपये मानधन देण्याचे ठरले होते. तेव्हा मी खूप आनंदी होतो. शूटिंग संपल्यानंतर मी चित्रपट पाहायचो आणि मुंबईतील स्ट्रीट फूडचा आस्वाद घ्यायचो. सलाम बॉम्बे प्रचंड गाजला. राष्ट्रपतींनी माझ्याबरोबर फोटो काढले, तेव्हा हे सगळे एखाद्या स्वप्नासारखे वाटत होते. पण ते स्वप्न फार लवकर संपले. चित्रपटाचे काम पूर्ण झाले आणि संपूर्ण टीम आपापल्या मार्गाने निघून गेली. त्यानंतर जवळपास आठ महिने मी मुंबईच्या रस्त्यांवर फिरत निर्मात्यांचे दरवाजे ठोठावत राहिलो, पण नशिबाने साथ दिली नाही."

यानंतरही एका मुलाखतीत शफीक सय्यदने त्याच्या संघर्षाची आणखी एक वेदनादायी बाजू सांगितली. तो म्हणाला, "मी पुन्हा मुंबईत आलो तेव्हा सलाम बॉम्बेच्या बातम्या अनेक वर्तमानपत्रांमध्ये होत्या. चित्रपटाला देश-विदेशातील अनेक पुरस्कारांसाठी नामांकन मिळत होतं आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कारही मिळत होते. मात्र, त्या पुरस्कार सोहळ्यांसाठी मला कधीच बोलावले गेले नाही. फक्त राष्ट्रीय पुरस्कार स्वीकारण्यासाठी दिल्लीला जाण्याची संधी मिळाली. त्यानंतर मी मुंबईतील असंख्य फिल्म स्टुडिओंना भेट दिली, पण कुठेच काम मिळाले नाही. माझ्याविषयी छापून आलेली वर्तमानपत्रांची कात्रणे घेऊन मी निर्मात्यांकडे जायचो. अनेकदा एखादा सहाय्यक दिग्दर्शक ती कात्रणे आणि माझा फोटो पाहून मला फक्त एवढेच विचारायचा, आज जेवलास का?". 'सलाम बॉम्बे'नंतर शफीक सय्यद आणखी एका चित्रपटात झळकला. दिग्दर्शक गौतम घोष यांच्या 'पतंग' या चित्रपटात त्याने भूमिका साकारली. मात्र, त्यानंतर त्याने चित्रपटसृष्टीला कायमचा निरोप दिला.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# महागड्या ‘एसी’ पेक्षाही भारी!





## ऐतिहासिक किल्ल्यातील ‘या’ खोलीत नेमकी काय आहे जादू? जाणून घ्या

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भीषण उन्हाळा सुरू आहे, बाहेर गरम हवेच्या तीव्र लाटा वाहत आहेत आणि अंगाची लाहीलाही होत आहे. अशा वातावरणात आपण घरात किंवा ऑफिसमध्ये लगेच एसी सुरू करतो. पण जरा विचार करा, आजपासून तब्बल ४०० वर्षांपूर्वी जेव्हा विजेचा शोधही लागला नव्हता, तेव्हा राजे-महाराजे या कडक उन्हाळ्यात स्वतःला कसे थंड ठेवत असतील?

कोणत्याही विजेविना आणि आधुनिक मशिनरीशिवाय निसर्गाच्या नियमांचा वापर करून शिमलासारखी थंड हवा देणारा एक राजेशाही महाल आजही अस्तित्वात आहे. याची थक्क करणारी विज्ञानावर आधारित इंजिनिअरिंग पाहून आजचे मोठे मोठे शास्त्रज्ञ आणि आर्किटेक्ट्स देखील डोक्याला हात लावतात. विजेशिवाय चालणारे हे जगातील अनोखे ‘नॅचरल एसी’ पाहायला मिळते ते राजस्थानची राजधानी जयपूर येथील ऐतिहासिक आमेर किल्ल्यामध्ये. युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांमध्ये समाविष्ट असलेल्या या किल्ल्यात एक विशेष खोली आहे, ज्याला ‘सुख निवास’ म्हणून ओळखले जाते.

आजच्या काळात जेव्हा आपण कडक उन्हाळ्याचा सामना करत आहोत, तेव्हा पुरातत्व विभागाने पर्यटकांसाठी हे ४०० वर्षे जुने कूलिंग सिस्टम पुन्हा एकदा सुरू केले आहे. कछवाहा शासक राजा मानसिंह प्रथम यांनी हे सुख निवास बांधले होते, ज्याची डागडुजी नंतर मिर्झा राजा जयसिंह यांनी केली.

### मावठा तलावाचे पाणी आणि वाऱ्याचे अप्रतिम विज्ञान

या महालात विजेविना थंड हवा मिळण्यामागे पूर्णपणे वैज्ञानिक दृष्टिकोन आहे. महालाच्या छतावर एक मोठी पाण्याची टाकी बांधण्यात आली आहे, ज्यामध्ये खाली असलेल्या मावठा तलावातून पाणी चढवले जायचे. यानंतर, पश्चिमेकडून येणाऱ्या वाऱ्यांची दिशा लक्षात घेऊन, हे पाणी संगमरवरी दगडांच्या बारीक नाल्यांमधून कारंज्याच्या स्वरूपात खाली सोडले जायचे. जेव्हा बाहेरची गरम हवा या वाहत्या पाण्यावरून प्रवास करायची, तेव्हा ती लगेच थंड व्हायची आणि खोलीत एसीसारखा गारवा निर्माण करायची.

### चंदनाचे दरवाजे आणि जाड भिंतींची कमाल

सुख निवासच्या प्रवेशद्वारावर चंदनाचे नक्षीकाम केलेले दरवाजे बसवण्यात आले आहेत. हे चंदनाचे लाकूड खोलीतील गारवा बाहेर जाऊ देत नाही. तसेच पाण्याच्या संपर्कात आल्यामुळे या चंदनाचा मंद आणि सुगंधी सुवास संपूर्ण खोलीत पसरतो. या महालाच्या भिंती चुना आणि संगमरवरी दगडांच्या मिश्रणाने अतिशय जाड बनवल्या आहेत, ज्यामुळे बाहेरची उष्णता आत येत नाही. महालाच्या अरुंद खिडक्या हवेचा दाब वाढवून खोलीत नैसर्गिक कूलिंग इफेक्ट तयार करतात.

### पर्यटकांना खास पर्वणी

पुरातत्त्व विभागाने अनेक वर्षांपासून बंद असलेले सुख निवास आणि शीश महालातील हे कारंजे आता पर्यटकांसाठी पुन्हा सुरू केले आहेत. आमेर महालाचे अधीक्षक राकेश छोलक यांनी सांगितले की, पूर्वी जे सिस्टम पूर्णपणे मानवी श्रमावर चालायचे, तिथे आता एक विशेष यंत्रणा तयार करून ते पुन्हा कार्यरत करण्यात आले आहे. जेणेकरून देश-विदेशातून येणाऱ्या पर्यटकांना त्या काळातील राजेशाही थाट आणि विजेविना जगले जाणारे आरामदायी जीवन जवळून अनुभवता येईल. यासोबतच चारबाग शैलीतील बागेतील कारंजेही सुरू करण्यात आले आहेत.

हिमाचल प्रदेशातून फिरण्यासाठी आलेल्या नेहा बिंद्रा या पर्यटकाने आपला अनुभव सांगताना म्हटले, की बाहेर भयानक उन्हाळा आहे, पण सुख निवासमध्ये पाऊल ठेवताच शरीराला प्रचंड आराम मिळतो. ४०० वर्षे जुनी ही भारतीय तंत्रज्ञान आजच्या महागड्या एअर कंडिशनरपेक्षा कितीतरी पटीने उत्तम आहे. उन्हाळ्याच्या दिवसात सुख निवास हे पर्यटकांचे सर्वात मोठे आकर्षण केंद्र बनले आहे. या ऐतिहासिक वारशाचे रक्षण करण्यासाठी आणि पर्यटकांच्या सुरक्षेसाठी प्रशासनाने १६० होमगार्ड आणि ५० फायर सेफ्टी गार्ड्स् अशा २०० पेक्षा जास्त सुरक्षारक्षकांना तीन वेगवेगळ्या शिफ्टमध्ये तैनात केले आहे.

## सक्सेस स्टोरी

# नीट पास कर बनीं डेंटिस्ट, यूपीएससी में ९७ वीं रैंक अब आईएएस अफसर हैं यशवी जैन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मन में कुछ बड़ा करने का जज्बा हो तो कोई भी चुनौती आपका रास्ता नहीं रोक सकती। दिल्ली के ग्रेटर कैलाश की रहने वाली डॉ. यशवी जैन की कहानी इसका सबूत है। यशवी ने आम साइंस स्टूडेंट्स की तरह १२वीं के बाद नीट परीक्षा पास की. फिर डेंटिस्ट (बीडीएस) के तौर पर करियर की शुरुआत भी कर दी थी. लेकिन उनके सपनों की उड़ान यहीं तक सीमित नहीं थी। दांत के मरीजों का इलाज करने के साथ-साथ उनके दिल में देश सेवा का सपना भी पल रहा था।

यशवी जैन के मम्मी-पापा वर्किंग हैं। उन्हीं की सलाह पर यशवी ने यूपीएससी सिविल सेवा परीक्षा की तैयारी शुरू की थी। यशवी के लिए यह डगर बिल्कुल आसान नहीं थी। एक तरफ उन्हें बतौर डेंटिस्ट अपनी इंटर्नशिप संभालनी थी तो दूसरी तरफ देश की सबसे कठिन परीक्षा यूपीएससी की तैयारी भी करनी थी। लेकिन उन्होंने हार नहीं मानी। दिन में हॉस्पिटल की व्यस्तता और रात में जागकर पढ़ाई- यही उनका रूटीन बन गया था। जानिए कैसे एक डेंटिस्ट ने अपनी मेहनत के दम पर यूपीएससी परीक्षा में ९७वीं रैंक हासिल की।

### दिन में ड्यूटी, रात में पढ़ाई

यशवी जैन की सक्सेस स्टोरी की सबसे बड़ी यूएसपी उनका गजब का टाइम मैनेजमेंट रहा। उन्होंने साल २०२३ में बीडीएस की इंटर्नशिप के साथ सिविल सर्विस की तैयारी शुरू की थी। दिनभर हॉस्पिटल में मरीजों की देखभाल और मेडिकल कामों में व्यस्त रहने के बाद वह बुरी तरह थक जाती थीं। लेकिन घर लौटते ही वे अपनी थकान भूलकर यूपीएससी के नोट्स और मॉक टेस्ट में डूब जाती थीं। जब दुनिया सो रही होती थी, तब यशवी देश की सबसे कठिन परीक्षा का सिलेबस खंगाल रही होती थीं।

### परिवार का मिला गजब सपोर्ट

यशवी जैन के माता-पिता (राजीव जैन और नीतू जैन) कॉर्पोरेट सेक्टर में काम करते हैं। उनके परिवार में सिर्फ उनके मामा ही सरकारी सेवा (भारतीय सूचना सेवा आयआयएस) में थे। अपने मामा का वर्किंग स्टाइल और देश के प्रति उनका समर्पण देखकर यशवी के मन में बचपन से ही अफसर बनने का बीज पड़ चुका था। जब उन्होंने इस मुश्किल राह पर चलने का फैसला किया तो उनके माता-पिता ने उन्हें रोकने के बजाय उनका हौसला बढ़ाया। परिवार के इसी भरोसे ने उन्हें दोहरी जिम्मेदारियों के बीच टूटने नहीं दिया।

### पहले प्रयास में हो गईं थीं फेल

यूपीएससी का सफर अक्सर लंबा और सब्र की परीक्षा लेने वाला होता है। यशवी जैन के साथ भी ऐसा ही हुआ. वह अपने पहले प्रयास में फेल हो गईं थीं। कई उम्मीदवार पहले अटेंप्ट में फेल होकर निराश हो जाते हैं, लेकिन यशवी ने इस नाकामी को सबक की तरह लिया। उन्होंने अपनी कमियां पहचानीं, नोट्स को बेहतर किया और दोगुनी ताकत के साथ दोबारा मैदान में उतरीं। उनकी यह जिद साल २०२५ में रंग लाई, जब उन्होंने ऑल इंडिया ९७वीं रैंक के साथ सीधे आईएएस की लिस्ट में अपनी जगह पक्की कर ली।

### १५ घंटे की पढ़ाई जरूरी नहीं

**यशवी जैन ने यूपीएससी के नए एस्पिरेंट्स को बेहद प्रैक्टिकल सलाह दी है। उनका मानना है कि यूपीएससी परीक्षा में सफल होने के लिए दिन में १४-१५ घंटे की किताबी पढ़ाई की जरूरत बिल्कुल नहीं है। सिर्फ आपकी ‘कंसिस्टेंसी’ यानी नियमितता मायने रखती है। आप जो भी पढ़ रहे हैं, उसे लेकर दिमाग में कोई कन्फ्यूजन नहीं होना चाहिए। तैयारी इतनी पक्की होनी चाहिए कि एग्जाम हॉल में बैठते ही आप हर सवाल का सही जवाब लिखने लग जाएं।**



## रात्रीच्या जेवणात करा ‘या’ ६ पदार्थांचा समावेश

### झोप आणि पचन दोन्ही राहील उत्तम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मूगडाळ पचायला अतिशय हलकी असते. रात्री भात किंवा चपातीसोबत तिचे सेवन केल्यास पोटावर ताण येत नाही आणि रक्तातील साखर नियंत्रित ठेवण्यासही मदत होऊ शकते.

**पनीर :** कमी मसाल्यांमध्ये तयार केलेले ग्रील्ड किंवा हलके परतलेले पनीर रात्रीच्या जेवणासाठी चांगला पर्याय आहे. यात भरपूर प्रथिने असल्याने स्नायूंना पोषण मिळते.

**इडली :** फर्मेन्टेड असल्यामुळे इडली सहज पचते. सांबार आणि चटणीसोबत खाल्ल्यास ती पौष्टिक, हलकी आणि रात्रीसाठी योग्य ठरते.

**दुधी भोपळा :** दुधी भोपळ्यात पाण्याचे प्रमाण जास्त आणि कॅलरी कमी असतात. त्याची भाजी किंवा सूप रात्री शरीराला हायड्रेट ठेवण्यास आणि पचन सुधारण्यास मदत करते.

**दलिया :** फायबरने समृद्ध असलेला दलिया भाज्यांसोबत खाल्ल्यास बराच वेळ पोट भरल्यासारखे वाटते. त्यामुळे रात्री उशिरा भूक लागत नाही आणि वजन नियंत्रणात ठेवण्यास मदत होते.

**खिचडी :** मुगाची डाळ आणि तांदळाची साधी खिचडी पोटासाठी अतिशय हलकी

# चाकूने कापता येईल एवढी जाड साय, दूध उकळताना फक्त ही सोपी युक्ती वापरा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

घरातील अनेक पदार्थांची चव वाढवणारी गोष्ट म्हणजे दुधाची साय. ताजी, जाड आणि मलईदार साय मिळाली की त्यापासून लोणी, साजूक तूप, श्रीखंड, बासुंदी, रबडी, कुल्फी किंवा विविध मिठाया बनवणे अधिक सोपे होते. शिवाय, घरच्या घरी तयार केलेल्या सायीपासून बनवलेले लोणी आणि तूप बाजारातील उत्पादनांच्या तुलनेत अधिक शुद्ध आणि चविष्ट असते. मात्र, अनेक गृहिणींची तक्रार असते की दूध उकळूनही त्यावर पुरेशी जाड साय येत नाही. काही वेळा साय इतकी पातळ असते की ती व्यवस्थित काढताही येत नाही, तर काही वेळा साय तुटून पुन्हा दुधात मिसळते. त्यामुळे भरपूर साय साठवून लोणी किंवा तूप बनवण्याचा बेतही फसतो. विशेषतः पॅकेटचे दूध वापरणाऱ्यांना ही समस्या अधिक जाणवते.

खरेतर दुधावर जाड साय येणे हे केवळ दुधाच्या प्रकारावर अवलंबून नसते, तर दूध उकळण्याची पद्धत, आचेची तीव्रता, वापरलेले भांडे, दूध थंड करण्याची प्रक्रिया आणि ते साठवण्याची पद्धत यांचाही त्यावर मोठा परिणाम होतो. अनेकदा आपण नकळत अशा काही चुका करतो, ज्यामुळे दुधातील फॅट व्यवस्थित वर जमा होत नाही आणि साय पातळ राहते. तुम्हालाही रोजच्या दुधावर भरपूर साय हवी असेल आणि घरच्या घरी लोणी व तूप बनवण्याचा विचार असेल, तर दूध उकळताना फक्त ही सोपी युक्ती वापरून पाहा. या लेखात आपण जाड साय मिळवण्यासाठीच्या प्रभावी किचन हॅक्स, टाळावयाच्या चुका आणि साय अधिक घट्ट होण्यासाठी उपयुक्त अशा काही खास टिप्स जाणून घेणार आहोत.

### दुधावर साय का येते?

दुधामध्ये फॅट, प्रथिने आणि पाणी असते. दूध गरम केल्यानंतर त्यातील फॅट वरच्या बाजूला जमा होऊ लागते. दूध थंड होत असताना त्यावर एक जाड थर तयार होतो, त्यालाच आपण साय किंवा मलई म्हणतो. दुधातील फॅटचे प्रमाण जितके जास्त, तितकी साय अधिक जाड होते.



### जाड साय मिळवण्यासाठी योग्य दूध निवडा

जर तुम्हाला भरपूर आणि जाड साय हवी असेल तर शक्यतो म्हशीचे दूध वापरा. म्हशीच्या दुधामध्ये फॅटचे प्रमाण गाईच्या दुधापेक्षा जास्त असल्यामुळे त्यावर नैसर्गिकरीत्या जाड साय तयार होते.जर पॅकेटचे दूध वापरत असाल तर फुल क्रीम दूध निवडणे अधिक फायदेशीर ठरते. टोंड किंवा डबल टोंड दुधावर तुलनेने कमी साय येते.

### दूध उकळताना ही सोपी युक्ती वापरा

दूध एकदाच उकळून लगेच गॅस बंद करू नका. प्रथम दूध चांगले उकळू द्या. त्यानंतर गॅस अगदी मंद आचेवर ५ ते १० मिनिटे तसेच राहू द्या.या प्रक्रियेमुळे दुधातील फॅट अधिक चांगल्या प्रकारे वर जमा होते. परिणामी थंड झाल्यानंतर साय अधिक जाड तयार होते.

### दूध वारंवार ढवळू नका

अनेकजण दूध उकळताना सतत चमच्याने ढवळतात. असे केल्याने वर जमा होणारा फॅटचा थर पुन्हा दुधात मिसळतो आणि साय कमी तयार होते.म्हणून दूध उकळताना आवश्यक तेवढेच ढवळा. सतत ढवळण्याची सवय टाळा.दूध उकळण्यासाठी रुंद आणि जाड बुडाचे भांडे वापरल्यास अधिक चांगला परिणाम मिळतो. रुंद पृष्ठभागामुळे साय तयार होण्यासाठी अधिक जागा मिळते.अरुंद भांड्यापेक्षा रुंद भांड्यात दुधावर अधिक समान आणि जाड साय तयार होते.

### दूध नैसर्गिकरीत्या थंड होऊ द्या

दूध उकळल्यानंतर लगेच फ्रीजमध्ये ठेवू नका. प्रथम ते पूर्णपणे खोलीच्या तापमानावर थंड होऊ द्या.नैसर्गिकरीत्या थंड होत असताना साय व्यवस्थित तयार होते. त्यानंतरच दूध फ्रीजमध्ये ठेवा.साय अधिक घट्ट व्हावी असे वाटत असेल तर दूध रात्रभर फ्रीजमध्ये ठेवा. दुसऱ्या दिवशी सकाळी साय अधिक घट्ट झालेली दिसेल.अशा सायीला चमच्याने किंवा अगदी चाकूच्या साहाय्यानेही सहज वेगळे करता येते.

### या चुका टाळा

- दूध उकळताच लगेच गॅस बंद करू नका.
- गरम दूध लगेच फ्रीजमध्ये ठेवू नका.
- सतत दूध ढवळू नका.
- कमी फॅट असलेल्या दुधातून जाड सायची अपेक्षा ठेवू नका.
- वारंवार गरम-थंड करण्याची प्रक्रिया टाळा.

# मित्र-मैत्रिणींचा बर्थ डे कधी आहे?

## आता ‘व्हॉट्सअॅप’वरही मिळणार रिमाएंडर, कसे ते जाणून घ्या

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

व्हॉट्सअॅप यूजर्सला खूश करणारे एक नवे फिचर आणण्याच्या तयारीत आहे. फेसबुकप्रमाणेच आता व्हॉट्सअॅपही तुम्हाला तुमच्या कॉन्टॅक्ट लिस्टमधील सर्वांच्या जन्मदिवसाचे रिमाएंडर देणार आहे. कंपनी एका नवीन ‘बर्थ डे रिमाएंडर’ फिचरवर काम करत आहे. यामुळे तुम्हाला इतर कोणत्या कॅलेंडर अॅपवर अवलंबून राहावे लागणार नाही.




### व्हॉट्सअॅप बीटा व्हर्जनमध्ये नवे फिचर

WABetaInfo च्या एका रिपोर्टनुसार हे नवे फिचर व्हॉट्सअॅप फॉर अँड्रॉईडच्या बीटा व्हर्जन २.२६.२७.३ मध्ये दिसले होते. सध्या हे फिचर डेव्हलपमेंट स्टेजवर आहे. म्हणजेच यावर काम चालू आहे आणि बीटा टेस्टर्ससाठी याला पूर्णपणे जारी करण्यात आलेले नाही. जेव्हा हे फिचर पूर्णपणे तयार केले जाईल तेव्हा व्हॉट्सअॅप यूजर्सला त्यांच्या कॉन्टॅक्ट लिस्टमधील एखाद्याच्या जन्मदिवसाला एक इन-अॅप नोटिफिकेशन पाठविले जाईल. या नोटिफिकेशनवर क्लिक करून यूजर थेट त्याच्या मित्राचा चॅट बॉक्स ओपन करू शकेल आणि तेथेच त्याला विश करू शकेल.

### एक वेगळा बर्थडे सेक्शन मिळणार

व्हॉट्सअॅप एक डेडिकेटेड बर्थ डे सेक्शन बनविण्याच्या तयारीत आहे. या सेक्शनमध्ये यूजर्सला त्याची सर्व कॉन्टॅक्ट लिस्ट दिसेल, ज्यांच्या जन्मदिवस येणार आहे. यामुळे असा फायदा होईल, की भविष्यात कोणाचे बर्थ डे आहेत, हे एकाचवेळी समजेल. तसेच त्यांच्या बर्थ डेसाठी तुम्हाला अॅडव्हान्स प्लॅनिंग करता येईल.

रिपोर्टनुसार हे फिचर तेव्हाच काम करेल जेव्हा यूजरची डेट ऑफ बर्थ व्हॉट्सअॅपकडे उपलब्ध असेल. हे फिचर आता टेस्टिंग आणि डेव्हलपमेंटवर काम करेल. प्रायव्हसी कंट्रोलबाबतही अद्याप पूर्ण माहिती समोर आलेली नाही. दरम्यान, अॅपमध्ये असा कोणताही विकल्प दाखविण्यात आला नाही, की ज्यामध्ये एखाद्या यूजरला माहिती होईल की त्याचा बर्थ डे कोणी पाहिला आहे. ‘मेटा’ने आतापर्यंत अधिकृतरित्या या फिचरची घोषणा केली नाही. तसेच याच्या रोलआऊटच्या कोणत्याही टाईमलाईनचा उल्लेख केलेला नाही. या फिचरसाठी यूजर्सला आणखी काही वेळ वाट पाहावी लागणार आहे.

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम

सीमा हॅण्डलूम हाऊस पारोळा रोड, धुळे






# सोमवती अमावास्या : १३ की १४ जुलै...यंदा पॉवरफुल, दुर्मिळ योगायोग

## शिवपूजेची योग्य पद्धत, पाच भाग्यशाली राशी, तिथी, मुहूर्त जाणून घ्या

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सध्या जुलै महिन्यातील दुसरा आठवडा सुरू आहे. याच आठवड्यातच सोमवती अमावास्या येत आहे. सोमवारी येणाऱ्या अमावास्येला 'सोमवती अमावास्या' असे म्हटले जाते. हिंदू धर्मात या तिथीला अत्यंत पवित्र आणि पुण्यदायी मानले जाते. या अमावास्येच्या दिवशी भगवान शंकर यांची पूजा, स्नान-दानासोबतच पूर्वजांची पूजा करण्याची प्रथा आहे. धार्मिक मान्यतेनुसार पुण्यकर्म प्राप्त होत असल्याने भगवान शिवजी यांच्या पूजेचे महत्त्व, भाग्यशाली राशी, स्नान आणि दान करण्याची अचूक तारीख, महत्त्व, शुभ वेळ येथे जाणून घ्या.



**या दिवशी काय करावे?**

- ब्रह्ममुहूर्तावर उठून स्नान करावे.
- भगवान शिव आणि माता पार्वतीची पूजा करावी.
- 'ॐ नमः शिवाय' मंत्राचा जप करावा.
- पितरांसाठी तर्पण किंवा श्राद्ध करावे (शक्य असल्यास).
- गरजूंना दान आणि अन्नदान करावे.

**काय टाळावे?**

- वादविवाद, राग आणि अपशब्द टाळावेत.
- कोणाचाही अपमान करू नये.
- शक्यतो तामसिक आहार आणि व्यसनांपासून दूर राहावे.

### सोमवती अमावास्या कधी? १३ की १४ जुलै?

मराठी दिनदर्शिकेनुसार सोमवती अमावास्या तिथी पुढीलप्रमाणे आहे.

**आषाढ अमावास्या :** मंगळवार, १४ जुलै २०२६

**अमावास्या तिथी प्रारंभ :** १३ जुलै २०२६, सायंकाळी ६:५० वाजता.

**अमावास्या तिथी समाप्त :** १४ जुलै २०२६, दुपारी ३:१२ वाजता.

यावर्षी जुलै महिन्यातील अमावास्या सोमवारी आल्यामुळे तिला सोमवती अमावास्या असे म्हणतात.

### सोमवती अमावास्या शुभ योग

सोमवारी येणाऱ्या अमावास्येला 'सोमवती अमावास्या' असे म्हटले जाते. हिंदू धर्मात या तिथीला अत्यंत पवित्र आणि पुण्यदायी मानले जाते. चंद्राचा दिवस (सोमवार) आणि अमावास्या यांचा दुर्मिळ संयोग झाल्याने या दिवसाचे धार्मिक महत्त्व वाढते.

### धार्मिक महत्त्व

सोमवती अमावास्या ही भगवान शिवजी, देवी पार्वती आणि पितरांच्या पूजेसाठी अत्यंत शुभ मानली जाते. या दिवशी स्नान, दान, जप, तप आणि पितृतर्पण केल्याने विशेष पुण्य मिळते, अशी श्रद्धा आहे. पितरांचे आशीर्वाद मिळावेत आणि पितृदोष कमी व्हावा यासाठी अनेक जण तर्पण-श्राद्ध करतात. धार्मिक श्रद्धेनुसार सोमवती अमावास्या ही आत्मशुद्धी, पितृकृतज्ञता, दानधर्म आणि भगवान शिवजींच्या उपासनेला समर्पित दिवस मानला जातो. या दिवशी श्रद्धेने केलेली पूजा, जप आणि दान यांना विशेष महत्त्व असल्याचे विविध धार्मिक ग्रंथ आणि परंपरांमध्ये सांगितले जाते.

### शिवपूजेचे महत्त्व

धार्मिक मान्यतेनुसार सोमवार हा भगवान शिवजी यांचा दिवस मानला जातो. त्यामुळे या दिवशी शिवलिंगावर जल, दूध, बेलपत्र, धतुरा अर्पण करून 'ॐ नमः शिवाय' मंत्राचा जप केल्यास मनोकामना पूर्ण होतात.

### विवाहित महिलांसाठी महत्त्व

विवाहित महिला पतीच्या दीर्घायुष्यासाठी आणि सुखी वैवाहिक जीवनासाठी सोमवती अमावास्येचे व्रत करतात. काही ठिकाणी पिंपळाच्या झाडाची पूजा करून त्याला १०८ प्रदक्षिणा घालण्याची परंपरा आहे.

### पितृकार्य, दानाचे महत्त्व

या दिवशी पवित्र नदीत स्नान करून पितरांना तर्पण अर्पण करणे शुभ मानले जाते. गरजू लोकांना अन्न, वस्त्र, तीळ, धान्य किंवा दक्षिणा दान केल्यास पितर प्रसन्न होतात, अशी श्रद्धा आहे. सोमवती अमावास्येला केलेले दान विशेष फलदायी मानले जाते. तीळ, अन्नधान्य, वस्त्र, गूळ, तूप, फळे किंवा आर्थिक मदत गरजूंना देण्याची परंपरा आहे.

# प्रदोषचा उपवास करताना कोणते नियम पाळावे?

## उपवास सोडण्याची पद्धत

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

प्रदोष व्रत हे भगवान शंकर यांच्या पूजेसाठी अत्यंत शुभ मानले जाते. हे व्रत केल्याने जीवनातील संकटे दूर होऊन सुख-समृद्धी लाभते, अशी भाविकांची श्रद्धा आहे. प्रदोष व्रत करताना कोणते महत्त्वाचे नियम पाळावेत, हे जाणून घेऊया.

**मासिक शिवरात्री कधी असते?**

हिंदू दिनदर्शिकेनुसार मासिक शिवरात्री उत्सव प्रत्येक महिन्याच्या कृष्ण पक्षाच्या चतुर्दशी तिथीला साजरा केला जातो. या दिवशी उपवास केला जातो आणि भगवान शिवजींची पूजा केली जाते. भगवान भोलेनाथांना समर्पित या तिथीचे शिवभक्तांसाठी विशेष महत्त्व आहे. प्रत्येक महिन्यात येणारी ही तिथी भगवान शिवजी आणि माता पार्वती यांना समर्पित आहे. म्हणूनच या दिवशी भगवान शिवजी आणि माता पार्वती यांची पूजा विधीपूर्वक केली जाते. मासिक शिवरात्रीचे व्रत करणाऱ्या व्यक्तीला भगवान शंकरांसोबत माता पार्वती यांचाही आशीर्वाद प्राप्त होतो. यासोबतच त्याच्या जीवनात सुख-शांती कायम राहते.

या व्रतामध्ये रात्री भोलेनाथांची पूजा केली जाते. या दिवशी महादेवांचे व्रत करणाऱ्या मुलींना जे हवे ते मिळते. या मध्यरात्री भगवान शिवजी शिवलिंगाच्या रूपात प्रकट झाले. भगवान ब्रह्मा आणि भगवान विष्णू यांनीही या दिवशी भोलेशंकर यांची पूजा केली.

असे मानले जाते, की या दिवशी लक्ष्मी, सरस्वती, सीता, पार्वती, रती या इतर देवींनी मोक्षासाठी उपवास आणि पूजा केली. जे लोक या दिवशी भगवान शंकर यांची पूजा करतात त्यांच्यावर महादेवांची कृपा सदैव राहते.

# महाराष्ट्रातील १२ प्रसिद्ध शिव मंदिरे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भगवान शिवजींच्या भारतातील १२ ज्योतिर्लिंगांपैकी ३ ज्योतिर्लिंगाचे मंदिर महाराष्ट्रात आहे. नाशिकमधील त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंग, पुण्याजवळील भीमाशंकर ज्योतिर्लिंग आणि औरंगाबादजवळील घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग, परळीजवळील वैद्यनाथ आणि हिंगोलीतील औंढा नागनाथ मंदिर ही महाराष्ट्रातील सर्वांत प्रसिद्ध शिव मंदिरे आहेत.



**१) त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंग, नाशिक**

त्र्यंबकेश्वर शिव मंदिर नाशिक शहरापासून २८ किलोमीटरवर असून गोदावरी नदीच्या उगमस्थानाजवळील भारतातील बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक आहे. हे ठिकाण पावसाळ्यातील निसर्गसौंदर्यासाठी देखील ओळखले जाते आणि हिरवेगार डोंगर आणि अंजनेरी पर्वत यांनी वेढलेले आहे.

**२) भीमाशंकर ज्योतिर्लिंग, पुणे**

भीमाशंकर ज्योतिर्लिंग मंदिर हे भीमा नदीच्या उगमस्थानाजवळ सह्याद्री पर्वतरांगांच्या घाट प्रदेशात वसलेले भगवान शिवाचे प्राचीन मंदिर आहे. उंच पर्वतरांगांच्या सभोवतालची घनदाट जंगले वनस्पती आणि प्राण्यांच्या दुर्मिळ प्रजातींचे निवासस्थान आहेत आणि नदी, दरी आणि हिल स्टेशनचे एक अद्भुत दृश्य देते.

**३) घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग, औरंगाबाद**

घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग मंदिराचा उल्लेख शिवपुराणात आढळतो आणि ते पृथ्वीवरील शेवटचे किंवा १२ वे ज्योतिर्लिंग मानले जाते. अनेक भारतीय देवी-देवतांच्या सुंदर कोरीवकाम आणि शिल्पांसह लाल खडकांनी बांधलेले मंदिर आणि मंदिराच्या आतील वसंत ऋतूसाठी देखील ओळखले जाते.

**४) औंढा नागनाथ मंदिर, हिंगोली**

औंढा नागनाथ शिव मंदिर ज्योतिर्लिंग हे महाराष्ट्रातील हिंगोली जिल्ह्यातील औंढा नागनाथ येथे स्थित ज्योतिर्लिंगांपैकी एक मानले जाते. मंदिर हे तीर्थक्षेत्र एक महत्त्वाचे ठिकाण आहे आणि त्याच्या अविश्वसनीय सुंदर कोरीव कामांसाठी ते पाहण्यासारखे आहे.

**५) कैलास शिव मंदिर, एलोरा**

एलोरा येथील कैलास मंदिर हे भगवान शिवजींच्या प्राचीन हिंदू मंदिरांपैकी एक आहे. कैलास मंदिर कैलास पर्वत, भगवान शिवजींचे घर आणि एकाच खडकात कोरलेल्या मेगालिथची आठवण करण्यासाठी डिझाईन केलेले आहे. हे भारतातील सर्वांत प्रसिद्ध भगवान शिव मंदिरांपैकी एक आहे.

**६) अंबरनाथ शिवमंदिर, अंबरनाथ**

अंबरनाथ हा मुंबई महानगर प्रदेशाचा एक भाग आहे आणि अंबरेश्वर शिव मंदिर हे वडवण नदीच्या काठावर वसलेले आहे. जे हेमाडपंथी शैलीसाठी ओळखले जाते. दगडांवर सुंदर कोरलेले आहे. भगवान शंकर यांचा आशीर्वाद घेण्यासाठी हे मंदिर श्रावण महिन्यात गर्दीने फुलून जाते.

**७) कोपेश्वर शिव मंदिर, कोल्हापूर**

कोपेश्वर मंदिर हे कोल्हापूरच्या खिद्रापूर येथे आहे. ज्यात देवता आणि धर्मनिरपेक्ष आकृतींचे अप्रतिम नक्षीकाम आहे. कोल्हापुरातील कृष्णेच्या तीरावर वसलेल्या खिद्रापूरमध्ये हे मंदिर लपलेले रत्न म्हणूनही ओळखले जाते.

**८) वैजनाथ शिव मंदिर, परळी**

महाराष्ट्रातील परळी येथील वैजनाथ मंदिरात बीड जिल्ह्यात असलेल्या महाशिवरात्री उत्सवात महाराष्ट्रातील सर्वांत मोठी जत्रा भरते. परळी शिव मंदिर हे भारतातील प्रसिद्ध ज्योतिर्लिंग आणि भगवान शिवजींचे सर्वांत शक्तिशाली स्थान आहे.

**९) भुलेश्वर शिव मंदिर, पुणे**

पुणे सोलापूर महामार्गावर पुण्यापासून सुमारे ४५ किलोमीटर अंतरावर शिवजींचे भुलेश्वर मंदिर आहे. हे शिवमंदिर एका टेकडीवर वसलेले असून ते १३ व्या शतकात बांधले गेले आणि ते संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्यात आले आहे.

**१०) मार्लेश्वर शिव मंदिर, संगमेश्वर**

मार्लेश्वर मंदिर रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर येथे आहे. संगमेश्वर हे ठिकाण आहे जेथे सोनवी आणि शास्त्री या दोन नद्या एकत्र वाहतात. मार्लेश्वर गुंफा शिव मंदिर हे देवरूखपासून १७ किलोमीटर अंतरावर असलेल्या शायद्री पर्वतरांगेत असलेले लेणी मंदिर आहे.

**११) अमृतेश्वर शिव मंदिर, अहमदनगर**

अहिल्यानगर जिल्ह्यातील रतनवाडी गावातील अमृतेश्वर शिव मंदिर हेमाडपंथी स्थापत्य शैलीत बांधलेले आहे. रतनवाडीचे हे सुंदर दगडी कोरीव शिव मंदिर महाराष्ट्रातील भगवान शिव मंदिरांपैकी एक आहे.

**१२) गोंदेश्वर शिव मंदिर, नाशिक**

नाशिक जिल्ह्यातील सिन्नर येथील गोंदेश्वर मंदिर हेमाडपंथी स्थापत्यशैलीत बांधले गेले आहे आणि महाराष्ट्रातील पाहण्यासारखे मंदिर आहे. गोंदेश्वर मंदिराचे मुख्य देवस्थान भगवान शिवजींना समर्पित आहे आणि भिंतीवर अतिशय सुंदर दगडी कोरीवकाम केलेले आहे.

# भगवान शिवजींचे वडील आणि आई कोण? सत्य जाणून घ्या

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भगवान शिवजी हे हिंदू धर्मातील सर्वांत महत्त्वाचे आणि पूजनीय देवता आहेत. त्यांना देवांचे देव महादेव असेही म्हणतात. असे मानले जाते, की भगवान शिवजी हे शाश्वत, अनंत आणि स्वयंभू आहेत. जेव्हा भगवान शिवजी हे सर्व देवतांमध्ये श्रेष्ठ असतात तेव्हा मनात भगवान शिवजींचे वडील आणि आई कोण आहेत याबद्दल उत्सुकता निर्माण होते. कारण बहुतेक भक्तांना भगवान शिवजींच्या आई-वडिलांबद्दल माहिती नसते. श्रीमद् देवी भागवत पुराण आणि इतर धार्मिक ग्रंथ भगवान शिवजींच्या जन्माची कथा सांगतात. त्या अनुषंगाने भगवान शिवजींविषयीची माहिती जाणून घेणे अतिशय महत्त्वपूर्ण आहे.

### भगवान शिवजी यांचे वडील कोण?

पवित्र हिंदू धर्मग्रंथांनुसार भगवान ब्रह्मा अर्थात विश्वाचे निर्माते हेच भगवान शिवजी यांचे वडील असल्याचे म्हटले जाते. तथापि, जन्म जैविक नव्हता, तर तो वैश्विक ऊर्जेचा परिणाम होता. भगवान शिवजी यांचा जन्म एका वैश्विक अंडापासून झाला, असे म्हटले जाते. ज्याला हिरण्यगर्भ असे म्हणतात. अंड हे विश्वाचे मूळ स्वरूप आहे. ज्यातून भगवान ब्रह्मा आणि भगवान विष्णू यांचा जन्म झाला. भगवान ब्रह्मा हे भगवान विष्णूंच्या नाभीतून कमळ म्हणून जन्माला आले. भगवान शिवजींच्या दिव्य उत्पत्तीचा अत्यंत आदराने सन्मान करण्यासाठी एका कार्यक्रमाचे आयोजन करण्याचा विचार करू शकता. महारुद्राभिषेक एका प्रमाणित पंडिताद्वारे संपूर्ण भक्तीभावाने केलेले कार्य.

### भगवान शिवजींची आई कोण?

निसर्गाचे अमूर्त स्वरूप किंवा प्रकती म्हणजेच भगवान शिवजींची आई मानली जाते. बहुतेक लोक असा विश्वास करतात, की भगवान शिवजी आनंदी. या जगाचे महत्त्व कोणत्याही टप्प्यातून सुरू झाले किंवा विकसित झाले, असे म्हणता येणार नाही. भगवान शिवजी त्यांच्या सध्याच्या आनंदी स्वरूपात अस्तित्वात असल्याने त्यांना जन्म किंवा आपण ज्याला फक्त दैनंदिन जीवनाची सुरूवात म्हणू शकतो. ते अनुभवता येत नाही. ते त्यांच्या जन्माच्या आणि मृत्यूच्या पलीकडेही जीवंत राहिले आहेत. पौराणिक कथांमध्ये असेही म्हटले आहे, की त्यांची आई आणि पत्नी अर्थात देवी पार्वती याच त्यांची आई आहे. सर्वांची आई देवी दुर्गा ही भगवान शिवजींची आई असल्याचे देखील म्हटले जाते. श्रीमद् देवी भागवत पुराणानुसार देवी दुर्गा ही भगवान शिवजींची आई आहे. हिंदू आख्यायिका भगवान शिवजी यांनी मानवजातीत घेतलेल्या असंख्य अवतारांचे वर्णन करतात. या अवतारांमध्ये त्यांचे पालक सहसा भगवानांचे समर्पित अनुयायी असतात.

### भगवान शिवजींचे पित्या आणि आई यांचे पुरावे

श्रीमद्भगवद्गीता अध्याय १४, श्लोक ३-५, प्रकृती, किंवा देवी दुर्गेने तीन गुणांना जन्म दिला- सत (विष्णू), राज (राजगुण ब्रह्मा), आणि टॅम (तमोगण शंकर). प्रकृतीला 'मदर निसर्ग'कारण तिने सर्व प्राण्यांना जन्म दिला. गीतेच्या ज्ञानाचा स्वीकारकर्ता सर्व सजीवांचा पिता आहे. दुर्गेच्या गर्भाशयात बीज पेरतो (प्रकृती) जो सर्व प्राण्यांना जन्म देतो. शिवपुराणात भगवान शिवजींच्या निर्मात्याबद्दल निर्णायक माहिती दिली आहे. अनेक ठिकाणी भगवान सदाशिव यांचा भगवान शिवजी, ब्रह्मा आणि विष्णू यांचे वडील म्हणून उल्लेख केला जातो. यावरून हे स्पष्ट होते, की भगवान शिवजी जन्माला येतात आणि मरतात आणि अमर नाहीत. श्रीमद् देवी भागवत असेही स्थापित करतात, की ब्रह्मा, विष्णू आणि शिवजी जन्म घेतात आणि मृत्युमुखी पडतात.

### भगवान शिवजींचे मूळ

पौराणिक ग्रंथांमध्ये भगवान शिवजींच्या पालकांबद्दल आणि उत्पत्तीबद्दल विविध कथा आणि श्रद्धा आहेत. त्यापैकी बहुतेक लोक म्हणतात, की भगवान शिवजी आनंदी आहेत (ज्याची सुरूवात नाही) आणि ते स्वतःहून निर्माण झाले आहेत. शिवजींची निर्मिती, स्थिती आणि विनाशाची देवता म्हणून पूजा केली जाते आणि त्यांना विश्वाची मूळ शक्ती मानले जाते. तथापि, काही ग्रंथांमध्ये भगवान शिवजींच्या पालकांचा उल्लेख आहे.

### श्रीमद्भागवत देवी पुराण

श्रीमद्भागवत देवी पुराणानुसार एकदा देवर्षीमध्ये नारदांनी त्यांचे वडील ब्रह्मा यांना विचारले, की हे जग कोणी निर्माण केले आणि भगवान विष्णू, भगवान शिवजी आणि तुमचे पालक कोण आहेत? नारदजींच्या प्रश्नांची उत्तरे देत, ब्रह्माजी त्यांना भगवान शिवजी, भगवान विष्णू, ब्रह्माजी आणि त्यांच्या पालकांच्या जन्माबद्दल सांगू लागले.

ब्रह्माजी म्हणाले, की ब्रह्मा, विष्णू आणि महेश हे त्रिमूर्ती दुर्गा आणि शिवजी यांच्या योगातून ब्रह्मा किंवा काल-सदाशिव. निसर्गात दुर्गा ही तिन्ही देवांची आई आहे आणि काळ सदाशिव आपले वडील आहेत.



### शिवपुराण, विदेश्वर संहिता, अध्याय १०

भगवान शिवजींच्या उत्पत्तीबद्दल आणखी एक कथा अशी आहे, की एकदा ब्रह्माजी आणि भगवान विष्णू यांच्यात वाद झाला. या वादात ब्रह्माजी भगवान विष्णूंना म्हणाले, की मी तुझा पिता आहे. कारण सर्व सृष्टीची उत्पत्ती माझ्यापासून आहे. मी प्रजापती आह. म्हणून मी तुझा पिता आहे.

मग भगवान विष्णू ब्रह्मदेवांना म्हणाले, की तू माझा बाप नाहीस, पण मी तुझा बाप आहे. कारण तू माझ्या नाभी कमळातून जन्माला आला आहेस.

ब्रह्माजी आणि विष्णूजींचा वाद वाढला. मग सदाशिव त्यांचा वाद सोडविण्यासाठी तेथे पोहोचले आणि म्हणाले, की पुत्रांनो, मी तुम्हाला जगाची उत्पत्ती आणि स्थिती या स्वरूपात दोन कामे दिली आहेत.

त्याचप्रमाणे मी विनाशाचे काम सोपविले आहे आणि तिरोगती शिव आणि रुद्र यांना. माझी पाच तोंडे आहेत.

अगदी लहान वस्तू (अ) एकाच तोंडातून, उकार (यू) दुसऱ्याकडून, मुकर (म) तिसऱ्या तोंडातून, बिंदू (.) चौथ्यापासून, आणि शिवण (शब्द) पाचव्यापासून. हा शब्द 'ओम' या पाच घटकांच्या संयोगाने तयार झाला. 'ओम' माझा मुख्य मंत्र आहे.

### शिवपुराण

त्यानुसार शिवपुराण, भगवान शिवजी हे शाश्वत आणि स्वयंभू मानले जातात. हे पुराण सांगते, की भगवान शिवजी यांचा जन्म नाही आणि ते सृष्टीच्या आरंभ आणि अंताच्या पलीकडे आहेत. शिवपुराणात एक कथा आहे, की ज्यामध्ये भगवान ब्रह्मा आणि भगवान विष्णू यांच्यात वाद आहे. जे दोघेही सर्वोच्च देवता आहेत आणि भगवान शिवजी त्यांच्या वादाचा अंत करण्यासाठी लीला करतात. त्यावेळी प्रकाशस्तंभ (लिंगा) प्रकट झाला. महादेव ब्रह्मा आणि भगवान विष्णूंना त्या स्तंभाचा आरंभ आणि शेवट शोधण्याचा आदेश देतात. दोन्ही देवता त्या स्तंभाचा आरंभ आणि शेवट ओळखण्यात अपयशी ठरतात. मग त्यांना कळते की भगवान शिवजी सर्वोच्च आहेत.

### लिंग पुराण

लिंग पुराण हे त्यापैकी एक आहे. १८ महापुराण जे भगवान शिवजींच्या कथेचे वर्णन करते. ज्योतिर्लिंग... यात भगवान शिवजींचा महिमा वर्णन करणारे ११ हजार श्लोक आहेत. लिंग पुराण हे सर्व पुराणांमध्ये सर्वोत्तम मानले जाते. लिंग पुराणातही भगवान शिवजी स्वयंभू आणि आनंदी असल्याचे म्हटले आहे. त्यात शिवलिंगाचे वैभव आणि त्याच्या विविध रूपांचे वर्णन केले आहे. पुराणातही भगवान शिवजींना सर्वोच्च शक्ती म्हणून मान्यता आहे. भगवान शिवजी हे हिंदू धर्मातील सर्वोच्च देवता आहेत. श्रीमद्देवी महापुराणात भगवान शिवजींच्या आई-वडिलांचा उल्लेख आहे. त्यानुसार महापुराणात एकदा नारदजींनी त्यांचे वडील ब्रह्माजींना विचारले, की विश्वाची निर्मिती कोणी केली? तसेच भगवान विष्णू, भगवान शिवजी आणि तुमचे वडील कोण आहेत?

मग ब्रह्मदेवांनी नारदजींना त्रिदेवांच्या जन्माबद्दल सांगितले. त्यांनी सांगितले, की निसर्गाचे एक रूप दुर्गा ही आपल्या तिघांचीही आई आहे आणि ब्रह्मदेव म्हणजेच काल सदाशिव हे आपले वडील आहेत. भगवान शिवजी यांना महादेव, भोलेनाथ, शंकर, महेश, रुद्र आणि नीलकंठ अशा अनेक नावांनी ओळखले जाते. तंत्रसाधनेत त्यांना 'भैरव' म्हणूनही ओळखले जाते. ते हिंदू धर्मातील मुख्य देवांपैकी एक आहेत आणि त्यांना भैरव म्हणूनही ओळखले जाते.

**(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)**